# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date 12 April 2025
## Time 11.00 to 11.05 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक: १२ एप्रिल २०२५ सकाळी ११.०० वाजता.

****

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करणाऱ्या पुण्यातील विद्यार्थ्यांनी आज पुन्हा एकदा रस्त्यावर उतरुन ठिय्या आंदोलन सुरु केलं आहे. काल रात्री अचानक विद्यार्थ्यांनी शास्त्री रस्त्यावर आंदोलन सुरु केल्यानं, इथली वाहतूक विस्कळीत झाली. कटऑफपेक्षा अधिक गुण मिळवूनही गुणवत्तायादीत स्थान न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. परिणामी, परीक्षा पुढे ढकलावी आणि पोलिस उपनिरीक्षक पदांच्या जागांमध्ये वाढ करावी, अशी मागणी या विद्यार्थ्यांनी केली आहे.

महाराष्ट्र गट 'ब'च्या पोलिस उपनिरीक्षक- पीएसआय परीक्षेसाठी राज्य सरकारतर्फे ४४१ पदांचं मागणीपत्र प्राप्त झालं होतं. राज्यात होणाऱ्या निवडणुकांमुळे परीक्षा पुढे ढकलण्यात आली. त्यानंतर ऑक्टोबर २०२४ मध्ये 'पीएसआय' पदांसाठी केवळ २१६ जागांसाठी जाहिरात काढण्यात आली. राज्य सरकारने २२५ जागा कमी केल्यामुळे विद्यार्थी हे आंदोलन करत आहेत.

****

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातल्या गर्भवतीच्या मृत्यू प्रकरणी, पुणे महानगरपालिकेच्या माता मृत्यू अन्वेषण समितीचा अहवालही प्रशासनाला सादर करण्यात आल्याची माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी दिली. या प्रकरणात धर्मादाय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीनं आपला चौकशी अहवाल गेल्या ८ तारखेला विधी आणि न्याय विभागाकडे सादर केला आहे. या दोन्ही चौकशी अहवालांवर राज्य शासनानं तातडीनं कारवाई करावी, अशी मागणी राज्य महिला आयोगाने केली आहे.

****

राज्यातील शिक्षकांचं अशैक्षणिक काम कमी करण्यासाठीचा निर्णय येत्या १५ दिवसात घेणार असल्याचं शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी म्हटलं आहे. यासाठी गठीत समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झाला असल्याचंही त्यांनी सांगितलं. नंदुरबार जिल्ह्यातल्या शिक्षण खात्याच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. पॅटच्या परीक्षा आवश्यक असून विद्यार्थ्यांना उन्हाचा त्रास होणार नाही, याची काळजी घेवून या परिक्षा घेतल्या जातील, बोगस शिक्षक भरती प्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून चौकशी सुरु असून त्यातून जे पुढे येईल त्यानरुप कारवाई करण्यात येईल असं ते म्हणाले. आगामी शैक्षणिक वर्षात मे महिन्यात गणवेश खरेदीसाठी मुख्याध्यापकांच्या खात्यात निधी टाकण्यात येणार असून आठवी ते दहावीपर्यतच्या मुलींसाठी सायकल वाटपाचा निर्णय विचाराधीन असल्याचंही मंत्री दादाजी भुसे यांनी या बैठकीत सांगितलं.

****

शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी, थकीत कर्जाबाबत सक्तीची वसुली थांबवावी, या मागणीसाठी आमदार बच्चू कडू यांच्या प्रहार जनशक्ती पक्षातर्फे काल अनेक ठिकाणी आंदोलन करण्यात आलं. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या नाशिक इथल्या निवासस्थानाबाहेर आंदोलकांनी एक तास ठिय्या दिला. मात्र कृषिमंत्री कोकाटे यांची भेट होऊ न शकल्यामुळे आंदोलनकर्ते त्यांना भेटण्यासाठी सिन्नरकडे रवाना झाले. पोलिसांनी कोकाटे आणि बच्चू कडू यांचं बोलणं करून दिलं. यावेळी शेतकरी संघटनेला आपण १७ तारखेला मुंबईत शेतकऱ्यांच्या मागण्याबाबत चर्चेसाठी बोलावलं असल्याची माहिती कोकाटे यांनी या आंदोलनकर्त्यांना दिली. दरम्यान, या मागण्यांबाबत प्रहार जनशक्ती संघटनेनं काल सायंकाळी सोलापूर इथं भाजपचे आमदार सुभाष देशमुख यांच्या घरावर मशाल मोर्चा काढला. याच मागणीसाठी गोंदिया इथंही प्रहारतर्फे काल रात्री आंदोलन करण्यात आलं.

****

पुर्णा–तिरूपती–पूर्णा आणि नांदेड – इरोड – नांदेड या रेल्वेगाड्या पुढचे काही दिवस सिंकदराबाद मार्गे न धावता तात्पुरत्या स्वरूपात चार्लेपल्लीमार्गे धावणार आहेत. प्रवाशांनी याची नोंद घ्यावी असं आवाहन दक्षिण मध्य रेल्वेकडून करण्यात आलं आहे.

****

हवामान – राज्यात काल अकोला इथं सर्वाधिक ४३ पूर्णांक पाच अंश सेल्सिअस तापमान नोंदवलं गेलं. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर इथं ४१ पूर्णांक चार, धाराशिव इथं ३९ अंश, तर परभणी आणि बीड इथं ४१ पूर्णांक पाच अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

****

श्रीनगरच्या काश्मीर विद्यापीठात चार ते सात एप्रिलदरम्यान आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ भारोत्तोलन स्पर्धेत मुंबई विद्यापीठाच्या प्रेरणा साळवी हिनं ६९ किलो वजन गटात ५०० किलो वजन उचलून रौप्य पदक जिंकलं. शिफा शेख हिनं ४७ किलो वजन गटात ३५७.५ किलो वजन उचलून कांस्य पदक पटकावलं.

****

इंडियन प्रिमिअर लीग आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दुपारी साडेतीन वाजता लखनऊ इथं गुजरात टायटन्स आणि लखनऊ सुपर जायंट्स या संघात तर हैदराबाद इथं सायंकाळी साडेसात वाजता पंजाब किंग्ज आणि सनरायजर्स हैदराबाद या संघांमध्ये सामना होणार आहेत. काल या स्पर्धेत चेन्नई इथं झालेल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सनं चेन्नई सुपर किंग्जचा ८ गडी राखून पराभव केला.

****